महाराष्ट्र शासन -आरोग्य सेवा

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे

जिल्हा आरोग्य अधिकारी,
दूरध्वनी क्र 26129965 .
ई-मेल आयडी-:dhopune@gmail.com,

"यशवंतराव चव्हाण भवन"
4 था मजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे1-,

जा.क्र.आरोग्य/रा आ अ / ७४४ / २४ पुणे
दिनांक :- १३ / ०८ /२०२४.

आरोग्य सेवा

## सेवा जेष्ठता यादीबाबत सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची दिनांक १.१.२०२४ रोजी ( ३१.१२.२०२३ रोजी किंवा त्यापुर्वी रुजु झालेल्या) सेवाजेष्ठता यादी शासन अधिसुचना दिनांक २१.०६.२०२१ अन्वये तसेच मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो. ते रुग्णालय संकुल, मंत्रालय, मुंबई ४००००१ यांचे पत्र क्र. एनएचएम-११२४/प्र. क्र.
२४५/आरोग्य-७/२०२४ दिनांक ३०.७.२०२४. अन्वये तयार करण्याबाबत मा. सहसंचालक, (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा. क्र. राआसो/आस्था/सेवाजेष्ठता यादी/४३१४४-४८३/२०२४ दिनांक ३१.०७.२०२४. अन्वये सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार जिल्हयातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची संवर्गनिहाय तात्पुरती सेवाजेष्ठता यादी (मराठी फॉन्ट)मध्ये तयार करण्यात आलेली असुन सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच संवर्गनिहाय सेवाजेष्ठता अंतरिम यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (www.zppune.org) उपलब्ध आहे.

सदर यादीमध्ये आपल्या किंवा अन्य अधिकारी व कर्मचारी यांचे नावासमोर नोंदविलेल्या माहितीबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या काही हरकती असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात योग्य त्या पुराव्यासह दिनांक १३.८.२०२४ ते २१.८.२०२४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) ४ था मजला, आरोग्य विभाग, नविन जिल्हा परिषद, कॅम्प, एसजीएस मॉल शेजारी, पुणे या पत्त्यावर समक्ष आक्षेप सादर करावेत. या सोबत देण्यात आलेल्या विहित नमुन्यातील आक्षेप अर्जासह पुराव्यासंबंधित सर्व आवश्यक दस्तऐवज सादर करावेत. तसेच पोस्टाने किंवा अन्य मार्गाने केलेले आक्षेप स्विकारले जाणार नाहीत याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

विहित कालावधीत योग्य त्या पुराव्यासह आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी ह संबंधित अधिकारी व कर्मचारी याची असुन याकरीता या कार्यालयाकडुन इतर कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. नमुद कालावधीनंतर आलेले कोणतेही आक्षेप स्विकारले जाणार नाही. प्राप्त आक्षेप विचारात घेऊन अंतिम सेवाजेष्ठता यादी व पुढील सुचना जिल्हा परिषद पुणे संकेतस्थळावर (www.zppune.org)प्रसिध्द करण्यात येईल. यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देत राहावे.

**संतोष पाटील (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**